आजचा दिनविशेष
१३०३ : अल्लाउद्दीन खिलजीने चित्तोडगड जिंकला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | मंगळवार २६ ऑगस्ट २०२५ | अंक २४७ | पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007 | All TOURS घर से घर तक | दिल से दिल तक | www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555


# तू कुण्या राजकारण्याच्या नादी लागशील पण, माझ्या नाही मनोज जरांगेचा भाजपच्या महिला नेत्याला इशारा

‘खोटं बोलून मतदान घ्यायचं पण शेतकऱ्यांची कर्जमाफी नाही. शेवटी अंगावर आलं तर रळीचा डाव खेळायचा, की माझ्या आईला बोलले. आरक्षण द्यायचं जीवावर आलं आहे तर आईकडे आणि बापाकडे घेऊन जात आहे. तुम्ही आरक्षण कसं देत नाही पाहतो मी. मी घेणारच आहे आरक्षण’ असंही जरांगे पाटलांनी म्हटलं आहे.जरांगे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, ‘सरकारला मराठ्यांना आरक्षण द्यायचं नाहीये, फक्त त्यांना काहीतरी कुरापती उकरून काढायच्या आहेत. जशी आज फडणवीस यांनी काहीतरी उकरून काढली. आरक्षण द्यायची वेळ आली तर आता आईला पुढे करत आहे. त्यांच्या आईला काही शब्द बोललो असेल तर ते मी ते विधान मागे घेतलेले आहे. मराठ्यांना आरक्षण द्यायचं नाही, मुंबईत येऊ द्यायचं नाही.’



मराठा आरक्षणाचे आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील हे 27 ऑगस्टला मुंबईकडे कूच करणार आहेत. मराठा आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी ते मुंबईत जाऊन आंदोलन करणार आहेत. अशातच भाजपच्या महिला नेत्या चित्रा वाघ यांनी जरांगे पाटलांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आईचा अपमान केला असल्याचा आरोप केला आहे. यावर आता जरांगे पाटलांनी उत्तर दिलं आहे. त्यांनी काय म्हटलं ते जाणून घेऊयात. मनोज जरांगे म्हणाले की, ;वाघ आणि शेळी मला काही माहीत नाही, आमच्या आई बहिणीवर दगडफेक केली तेव्हा ही कुठे गेली होती, आणि ही कोण आहे? तू कुण्या राजकारण्याच्या नादी लागशील पण माझ्या नादी लागू नको मी सगळं बिऱ्हाड उठविल; असा इशारा जरांगे पाटील यांनी चित्रा वाघ यांना दिला आहे पुढे बोलताना जरांगे पाटलांनी म्हटले की, ‘देवेंद्र फडणवीस यांनी आता बाया पुढे घालायचं ठरविल्याचे दिसत आहे. फडणवीस यांनी बाईच्या पदराआड लपू नये. तुझ्या आईवर बोललो इतकं लागलं, परंतु आमच्या आईचे डोके फोडले तेव्हा कुठे गेलता तू? राजकीय स्वार्थासाठी आईला पुढे घालायला लागला’ असंही जरांगे पाटलांनी म्हटलं आहे.



मुंबईला जाण्याबाबत बोलतान जरांगे पाटील म्हणाले की, ‘आम्ही 27 तारखेला आंतरवाली सराटी मधून बाहेर पडणार असून पैठण-शेवगाव-पांढरीपूल-अहिल्यानगर-आळेफाटा आणि त्यानंतर रात्रीचा मुक्काम शिवनेरी किल्ल्यावर असणार आहे. 26 तारखेच्या आत अंमलबजावणी केली तर ठीक आहे अन्यथा एकदा अंतरवाली सराटी सोडली तर नंतर चर्चा करणार नाही. थेट मुंबईमध्ये गेल्यावर चर्चा करू’ अशा इशारा मनोज जरांगे पाटलांनी दिला आहे.

## महाराजा यशवंत ब्रिगेडच्या राज्य प्रवक्ते पदी महेश पिंगळे सरांची निवड

बीड प्रतिनिधी : महाराजा यशवंत ब्रिगेड हे अनेक सामाजिक प्रश्नावर आवाज उठवणारे संघटन असून. सर्व समाजातील अनेक दुर्लक्षित, वंचित, शेतकरी समुदायना सोबत घेऊन काम करत आहे आणि त्यांच्या हक्क अधिकार साठी आवाज उठवत आहे.

महाराजा यशवंत ब्रिगेड संघटनेच्या महाराष्ट्र राज्य प्रवक्ते पदी महेश पिंगळे सर यांची निवड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा अविनाश दादा धायगुडे आणि सर्व राज्य कार्यकारणी यांच्या सर्वानुमताने निवड करण्यात आली आहे. महेश पिंगळे गेली अनेक वर्षांपासून महाराष्ट्रच्या कानकोपऱ्यात सर्व बहुजन महामानवांचे विचार आपल्या व्याख्यान च्या माध्यमातून सर्वाना पर्यंत पोहचवत आहेत. आपल्या सामाजिक कार्यातून अनेक वंचित, कष्टकरी घटक, मेंढपाळ बांधव तसेच ऊसतोड मजुरांना वेगवेगळ्या माध्यमातून मदत केली



आहे. अनेक सामाजिक प्रश्नावर आंदोलन करत बहुजन समाजाला न्याय देण्याचं काम या माध्यमातून महेश पिंगळे यांनी केल आहे. महाराष्ट्र मधील हजारो मेंढपाळ बांधवांच्या भेटी घेऊन त्यांचे प्रश्न सोडवणे, राज्यातील अनेक विद्यार्थी ना शिष्यवृत्ती मिळून देण्यापासून अनेक प्रश्न त्यांनी सोडवले आहेत. याच कामाची दखल घेत महाराजा यशवंत ब्रिगेड या संघटनेच्या महाराष्ट्र राज्य प्रवक्ते पदी महेश पिंगळे यांची निवड करण्यात आली आहे.

## मराठा सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली छत्रपती शाहू महाराजांची भेट

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड :कोल्हापूर येथील करवीर संस्थांनचे राजे खासदार छत्रपती शाहू महाराजांची नांदेड येथील मराठा सेवा संघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आज शासकीय विश्रामगृह नांदेड येथे त्यांची सदिच्छा स्नेहभेट घेऊन मा.पुरुषोत्तम खेडेकर लिखित पुस्तक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मराठा सेवा संघाचे



विभागीय अध्यक्ष शेरा पाटील मराठा सेवा संघाचे प्रदेश सहसचिव डॉ.पंजाबराव चव्हाण नानाराव कल्याणकर मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष अँड.सतीशकुमार जाधव जिल्हाध्यक्ष पंडितराव कदम काँग्रेसचे प्रवक्ते बालाजी गाडे आदी उपस्थित होते

## सौ. वसुधा नाईक यांना राज्यस्तरीय ग्लोबल स्टार 2025 पुरस्कार प्रदान...

ग्लोबल फौंडेशन व विद्यानिकेतन संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. वसुधा नाईक यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला. साहित्यक्षेत्र, कलाक्षेत्र, प्रसार माध्यम, समाजसेविका,उपक्रमशील शिक्षिका, कवयित्री, लेखिका, अशा अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेल्या मॅडम ‘ग्लोबल स्टार पुरस्कार २०२५’च्या त्या मानकरी ठरल्या.




त्यांनी ‘मानव सेवा आश्रम’ पाथर्डी येथील ३५ मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप, महिनाभराचे अन्नधान्य, सणावाराला कपडा लत्ता देऊन सामाजिक बांधिलकी जपलेली आहे.

तसेच ‘आपुलकी वृद्धाश्रम’ आळंदी, ‘निवारा वृद्धाश्रम ‘ धनकवडी, ‘मतिमंद ‘ मुलांची शाळा बारामती इथे त्यांनी आपल्या कुटुंबाचे वाढदिवस अन्नदान करून साजरे केलेले आहेत. असे अनेक समाजउपयोगी उपक्रम नेहमीच चालू असतात. तसेच त्या वृक्षारोपणही करतात. पर्यावरणासाठी सुद्धा काम करतात. सामाजिक बांधिलकी नेहमीच जपतात. अन्याय, अत्याचार,भ्रष्टाचार याविरुद्ध लढा देताना पोलीस मित्र म्हणून काम करतात.

यांच्याबरोबरच आणखी ७५ जणांचा सन्मान करण्यात आला.

हा कार्यक्रम सोहळा पुणे येथे सावित्रीबाई सभागृह, गंजपेठ येथे पार पडला, कार्यक्रमाच्या वेळी अनेक थोर व सन्माननीय प्रमुख पाहुण्यांची उपस्थिति लाभली.



बीड- येथील मांजरसुंबा येथे सवांद बैठकीदरम्यान संघर्षयोद्धा मा.मनोज (दादा) जरांगे पाटील हे आले असता त्यांचा भव्य सत्कार करताना अखिल भारतीय छावा संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक आण्णा रोमन यांच्यासह आदी.

## अवैधरीत्या विक्रीसाठी देशी दारू नेणा-यावर माजलगाव शहर पोलीसांचा छापा



दिनांक २५/०८/२०२५ रोजी गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, ईसम नामे सुरेश बाबुराव खंडागळे रा. गोविंदवाडी ता. माजलगाव जि. बीड हा नविन मोंडा माजलगाव येथे त्याचे मोटर सायकलवर स्वताहाचे फायदयासाठी विनापरवाना बेकादेशीररित्या देशी दारु कब्ज्यात बाळगुन दारूची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने नेत आहे, अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी सापळा रचुन ईसम नामे सुरेश बाबुराव खंडागळे रा. गोविंदवाडी ता. माजलगाव जि. बीड याची मोटरसायकल थांबऊन त्याची झडती घेतली असता त्याच्या ताब्यात एका नीळ्या रंगाच्या गोणीमध्ये दारूची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने देशी दारू किंमती ५६००/- रुपये तसेच मोटार सायकल किंमती ५०,०००/- रुपये असा एकुण ५५,६०० रुपयाचा मुद्देमाल मिळून आला.सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, निरज राजगुरु उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव याचं मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, पोउपनि केरबा माकणे, पोह / अस्लम

## गांधी बाल मंदिर हायस्कूल कुर्ला शाळेत गणेशोत्सव स्पर्धा उत्साहात साजऱ्या.




विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी सालाबाद प्रमाणे याही वर्षी गणेशोत्सव स्पर्धा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आल्या. अभिनय,पाठांतर, चित्रकला, हस्ताक्षर, वक्तृत्व, मेहंदी, भेटकार्ड बनवणे,समूहगीत यासारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता 5 वी ते 8 वी च्या विद्यार्थ्यांनी अतिशय छान प्रकारे स्पर्धांची तयारी करून सदरील स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला.

स्पर्धेच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक श्री अनिल पांचाळ सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून गणेशोत्सव स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

या संपूर्ण स्पर्धेचे नियोजन सौ. अश्विनी संखे मॅडम , श्री. जोशी सर,श्री. अमोल जागले सर,श्री.चव्हाण सर,श्री.विचारे सर,सौ सातपुते मॅडम,सौ. मंगला गायकवाड मॅडम यांनी केले.

## उमरा सर्कल मधून हजारो मराठा समाज बांधव मुंबईच्या दिशेने कूच करणार उमरा येथील चावडी बैठकीतून समाज बांधवांचा निर्धार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला खणखणीत इशारा देत २९-ऑगस्ट रोजी आझाद मैदान,मुंबई येथे उपोषण करण्याचे जाहीर केले आहे. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात चावडी बैठका नियोजनाने जोर धरला असून प्रामुख्याने नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक गावात सर्कलमध्ये मोठ्या प्रमाणात चावडी बैठका आयोजित केल्या जात आहेत. तरुण, अबाल, वृद्ध, ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी उस्फूर्तपणे चावडी बैठकीत सहभागी होत आहेत. स्वतः मनोज जरांगे पाटील यांचा नुकताच मागच्या आठवड्यात नांदेड जिल्ह्यात दौरा पार पाडला आहे, यावेळी त्यांनी २९-ऑगस्ट रोजी मुंबई येथील उपोषणाच्या अनुषंगाने आढावा घेतला. १५-ऑगस्ट रोजी त्यांची आढावा बैठक उमरा सर्कल मधील मारतळा नांदेड येथे पार पडली.



आढावा बैठकीमध्ये प्रचंड गर्दी पाहायला भेटली .मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून आप–आपल्या भागातील चावडी बैठकांचा अहवाल घेऊन अनेक मराठा सेवकांनी जरांगे पाटलांच्या भेटी घेतल्या. नांदेड जिल्ह्यातील प्रतिसाद पाहून स्वतः जरांगे पाटील ही भारावून गेले.नांदेडकरांनी आजवर मला खंबीर अशी साथ दिली, तसेच आज तुमचा उत्साह आणि या बैठकीतील सहभाग पाहून मला पूर्ण विश्वास आहे कि, नांदेड जिल्ह्यातून लाखो समाज बांधव मुंबई येथील आंदोलनासाठी माझ्यासोबत नक्कीच येणार असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. त्याच अनुषंगाने लोहा तालुक्यातील उमरा येथे २४-ऑगस्ट रोजी चावडी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीत समाज बांधवांनी एकदिलाने आरक्षण लढ्यात सामील होण्याचा निर्णय घेतला. यावेळी वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांनीही तुम्ही आरक्षण लढ्यासाठी मुंबई गाठा आम्ही तुमच्या समर्थपणे मागे असल्याचे गावकऱ्यांनी आश्वासित केले.यावेळी मनोज जरांगे पाटील यांचे समर्थक मराठा सेवक गावातील ज्येष्ठ नागरिक समाज बांधव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक लोकआरंभ लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २६ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## हृदयरोग आणि उच्च रक्तदाब यांच्यातील संबंध तुम्हाला नेमकं काय ?



आजकाल, उच्च रक्तदाब आणि हृदयरोग ज्या वेगाने वाढत आहेत ते तितकेच महत्त्वाचे आहे, म्हणून खबरदारी घेणे आणि त्याचे सर्व घटक लक्षात ठेवणे आणि समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. उच्च रक्तदाब आता केवळ वृद्धांचा आजार राहिलेला नाही, तर हा आजार तरुणांमध्येही वेगाने पसरत आहे. बऱ्याचदा लोकांना प्रश्न पडतो की उच्च रक्तदाब ( हाय बीपी ) चा हृदयाशी काय संबंध आहे, परंतु त्यांच्यात थेट संबंध आहे. डॉक्टर म्हणतात की जर बीपी नियंत्रणात नसेल तर त्याचा हृदयावर परिणाम होतो ज्यामुळे हृदयरोग होऊ शकतात आणि हृदय कमकुवत होऊ शकते. परंतु हे संबंध कसे कार्य करते हे समजून घेणे सर्वात महत्वाचे आहे. आजकालच्या व्यस्त जीवनशैलीमुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. आरोग्य तज्ञांच्या मते, जेव्हा उच्च रक्तदाबामुळे आपल्या धमन्यांवर रक्तदाब पडतो किंवा दाब खूप वाढतो तेव्हा रक्तवाहिन्या कठीण होतात किंवा कडक होतात. येथूनच हृदयावर परिणाम होऊ लागतो. आम्ही तुम्हाला सांगतो की धमन्या जितक्या कठीण असतात तितकेच हृदयाला रक्त पंप करण्यासाठी जास्त शक्ती लागते. ज्यामुळे हृदयावरील दबाव वाढू लागतो. हा दबाव हळूहळू हृदयाला थकवतो. उच्च रक्तदाब ( हाय बीपी ) हा नेहमीच "सायलेंट किलर" मानला गेला आहे. सुरुवातीला त्याची लक्षणे आढळत नाहीत, म्हणूनच बरेच लोक वर्षानुवर्षे उच्च रक्तदाबासह जगतात आणि त्याबद्दल त्यांना माहिती नसते. अंतर्गतरित्या, ते हृदयाच्या भिंती, धमन्या आणि अगदी मूत्रपिंडांवर देखील परिणाम करते. हे सर्व बदल लक्षात येत नाहीत आणि जेव्हा व्यक्तीला चक्कर येणे, छातीत दुखणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे यासारखी लक्षणे दिसतात तेव्हा स्थिती बरीच बिघडते. यामुळे हृदयविकाराचा धोका देखील असतो

हृदयरोग आणि उच्च रक्तदाब यांच्यातील थेट संबंध

कोरोनरी धमनी रोग (CAD): उच्च रक्तदाबामुळे रक्तवाहिन्यांमध्ये प्लाक जमा होतो, ज्यामुळे हृदयाला रक्तपुरवठा कमी होतो. यामुळे अँजायना किंवा हृदयविकाराचा झटका येतो.

हृदय अपयश: सतत उच्च रक्तदाबामुळे हृदयाचे स्नायू जाड आणि कमकुवत होतात. परिणामी हृदय योग्यरित्या पंप करू शकत नाही. हृदय अपयशामागील हेच कारण आहे.

अतालता: उच्च रक्तदाबामुळे हृदयाचे ठोके अनियमित होऊ शकतात, ज्यामुळे स्ट्रोक, हृदय अपयश आणि हृदयविकाराचा धोका वाढण्यासारख्या गंभीर परिस्थिती उद्भवू शकतात.

स्ट्रोकचा धोका: उच्च रक्तदाबाचा परिणाम केवळ हृदयावरच नाही तर मेंदूवरही होतो. जेव्हा रक्त मेंदूपर्यंत पोहोचत नाही किंवा रक्त प्रवाह थांबतो तेव्हा रक्ताच्या गुठळ्या होण्याची किंवा मेंदूतील रक्तस्त्राव होण्याची शक्यता वाढते कारण मेंदूपर्यंत ऑक्सिजन पोहोचू शकत नाही.

औषध हाच एकमेव उपाय आहे का?

अनेकांना असे वाटते की जर त्यांनी उच्च रक्तदाबाची गोळी घेतली तर सर्वकाही नियंत्रणात येते. पण सत्य हे आहे की केवळ औषध पुरेसे नाही. जीवनशैली व्यवस्थापन हे सर्वात मोठे शस्त्र आहे.

# गणेशोत्सव : परंपरा, एकात्मता आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख

. महाराष्ट्र सरकारने नुकताच एक ऐतिहासिक निर्णय घेत सार्वजनिक गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा दिला आहे . सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी विधानसभेत ही घोषणा करताना " गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या आत्म्याचा उत्सव आहे " असे प्रतिपादन केले . हा शासन निर्णय केवळ औपचारिकता नाही , तर लोकमान्य टिळकांच्या सामाजिक दृष्टीकोनाला सलाम करणारा , परंपरेला मान्यता देणारा आणि भविष्यातील पिढ्यांना दिशा दाखवणारा आहे .

इतिहासाच्या पाऊलखुणा : गणपती ही बुद्धी , विद्या , समृद्धीची देवता . वैदिक काळापासून गणेशोपासना अस्तित्वात आहे . परंतु १८९३ मध्ये लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले आणि ब्रिटिशांच्या विरोधात समाज एकत्र येण्याचे माध्यम निर्माण केले . गल्ल्या , वाडे , मोहल्ले एकत्र आले आणि गणपती बाप्पा मोरयाच्या घोषणांनी इंग्रजांविरुद्ध लढ्याला जनाधार दिला .

महाराष्ट्रातील परंपरा : महाराष्ट्रात गणेशोत्सव म्हणजे भक्ती , संस्कृती , समाजसेवा आणि लोकसहभाग यांचा संगम . पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपतीपासून मुंबईतील लालबागचा राजापर्यंत असंख्य मंडळे आपल्या कलात्मक मांडणी , सामाजिक उपक्रम आणि धार्मिक वातावरणासाठी प्रसिद्ध आहेत . लोकमान्य टिळकांनी घडवलेला हा उत्सव आज " गल्लोगल्लीतील बाप्पा " म्हणून महाराष्ट्राच्या प्रत्येक कोपऱ्यात पोचला आहे .महाराष्ट्रातील गणेश उपासनेत "अष्टविनायक यात्रा" विशेष मानली जाते . पुणे जिल्ह्यातील आठ प्राचीन गणेश मंदिरे – मुरुडचे मोरेश्वर , सिद्धटेकचे सिद्धिविनायक , ओझरचा विघ्नहर , लेण्याद्रीचा गिरिजात्मक , रांजणगावचा महागणपती , थेऊरचा चिंतामणी , पालीचा बल्लाळेश्वर आणि महडचा वरदविनायक – या सर्वांना एकत्र भेट देणे ही यात्रा पूर्ण मानली जाते . भक्त आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आणि गणरायाच्या कृपेचा लाभ घेण्यासाठी ही यात्रा करतात . त्यामुळे अष्टविनायक ही गणेशभक्तीची अनोखी परंपरा आहे . ओव्या अजूनही आपल्याला भूतकाळाशी जोडतात –

" गणराया गणपती देवा
तुझ्या चरणी माथा ठेवा
मंगलमुर्ती मोरया रे
दूर करो संकट सारे ."

भारत आणि जगातील गणेशोत्सव : आज गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही . गोवा , कर्नाटक , आंध्र प्रदेश , तेलंगणा इथून तो दक्षिण भारतात विस्तारला . उत्तर भारतात दिल्ली , मध्य प्रदेशात जबलपूर आणि इंदूर येथे मोठ्या उत्साहाने गणेशोत्सव होतो . परदेशातही भारतीय समाजाने हा उत्सव रूजवला आहे . लंडन , दुबई , सिंगापूर , अमेरिकेतील न्यू जर्सी व कॅलिफोर्निया , ऑस्ट्रेलिया , कॅनडा येथे दरवर्षी गणेशोत्सव साजरा केला जातो . परदेशातील गणेशोत्सव परदेशात राहणाऱ्या भारतीयांसाठी एक ओळखीचे घर बनतो .

गणेशोत्सव आणि समाजसेवा : गणेशोत्सव केवळ धार्मिक विधी नाही , तर विधायक कामांचे व्यासपीठ आहे . अनेक



मंडळे रक्तदान शिबिरे , आरोग्य शिबिरे , वृक्षारोपण , शैक्षणिक मदत , आपत्तीतील मदतकार्य अशी उपक्रम राबवतात . गणेशोत्सव हा लोकांना " फक्त साजरा नाही , तर समाजासाठी काही देणगी दे " हे स्मरण करून देतो .

गणेशोत्सव आणि एकात्मता : गणेशोत्सव हिंदू-मुस्लीम एकतेचा सेतू ठरला आहे . इतिहासात अनेक मंडळांच्या मिरवणुकांमध्ये सर्व धर्मीय सहभागी झाले . डोलताशे , लेझीम , भजन-कीर्तन , नृत्य , कलाविष्कार – सर्वांनी मिळून गणपतीला " लोकोत्सव " बनवले . तो फक्त धार्मिक नव्हे तर सामाजिक-सांस्कृतिक संगम आहे .

संगीत, गाणी आणि बाप्पा : गणेशावर आधारित असंख्य ओव्या , अभंग , गवळणी लोकजीवनात लोकप्रिय आहेत . आधुनिक काळातही बप्पावर आधारित हिंदी चित्रपट गाणी लोकप्रिय झाली – " सदैव सदा गणेश गणेश...", " गणपती बाप्पा मोरया..." (अग्निपथ चित्रपट ), " देवा श्री गणेशा " ( अग्निपथ ), " गणेश आया है " ( भूतनाथ रिटर्न्स ) यासारखी गाणी आजही मिरवणुकीत दुमदुमतात . लोककला , शास्त्रीय संगीत , आणि आधुनिक बॉलिवूड – सर्वांनी मिळून बाप्पाची भक्ती अधिक रंगतदार केली आहे .

शासन निर्णयाचे महत्त्व : या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने सार्वजनिक गणेशोत्सवाला " राज्य उत्सव " घोषित करणे ही केवळ परंपरेला मान्यता नव्हे तर सांस्कृतिक अस्मितेची जपणूक आहे . यामुळे मंडळांना शासकीय सुविधा मिळतील , उत्सवाची मुळे अधिक घट्ट होतील आणि जागतिक पातळीवर महाराष्ट्राची ओळख ठळक होईल .

बाप्पा हे महाराष्ट्राचे स्पंदन : गणेशोत्सव आपल्याला शिकवतो – भक्ती ही एकत्र आणणारी आहे , कला ही संस्कृतीला समृद्ध करणारी आहे आणि समाजकार्य हे खरी पूजा आहे . " गणेशोत्सव " हा महाराष्ट्राच्या जीवनातला श्वास आहे .

" जय देव जय देव जय मंगलमूर्ती
दर्शनमात्रे मनकामना पूर्ती "

गणेशोत्सव हा केवळ राज्य उत्सव नाही तर तो महाराष्ट्राच्या मनाचा उत्सव आहे , आणि आता शासनाने त्याला दिलेला मान म्हणजे परंपरेच्या मूळांना अधिक बळ देणे होय .

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

# अन्यायकारक अधिभार व वाढीव विजदेयक आकारूनघरगुती विजग्राहकांची लुट - उल्हास गिराम

बीड : (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्यातील विज ग्राहकांवर अन्यायकारक अधिभार व वाढीव विज रक्कम लादून हे भाजप शासित सरकार सामान्य घरगुती विज ग्राहकांची लुट करत असल्याचे निदर्शनास आल्या नंतर आज या विषयी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी महाराष्ट्र राज्य विधुत वितरण कंपनी च्या अभियंत्यास निवेदन दिले.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (MSEDCL) यांचेकडून आकारण्यात येणाऱ्या वीज देयकांमध्ये सामान्य घरगुती ग्राहकांवर असह्य आर्थिक भार टाकण्यात येत असल्याची बाब सर्वत्र निदर्शनास येत आहे. मासिक ९६ युनिट इतका अल्प वापर असूनही देयकाची रक्कम सुमारे रुपये ८५४ इतकी होत आहे. त्यामध्ये निव्वळ उर्जा शुल्क अंदाजे रुपये ४०० असून उर्वरित रक्कम विविध अधिभार व स्थिर शुल्काच्या स्वरूपात आकारली जाते. उर्जा शुल्क, वहन शुल्क, प्रसारण शुल्क, व्हिलींग शुल्क, इंधन समायोजन अधिभार, स्थिर शुल्क तसेच विविध कर व अधिभार यांच्या आकारणीमुळे सामान्य ग्राहकांवर अतिरिक्त भार येत आहे. औद्योगिक व व्यापारी ग्राहकांवर लावावयाचे अधिभार प्रत्यक्षात घरगुती ग्राहकांवर लादले जात आहे. विशेषत्वाने निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे की, स्मार्ट मीटर बसविण्याची योजना



प्रत्यक्षात खाजगी कंपनीच्या फायद्यासाठी राबविण्यात आलेली असून, त्यातून सामान्य नागरिकांना बिल वाढणे, चुकीचे रीडिंग, आणि ग्राहक सेवेत होणाऱ्या त्रुटी यामुळे अनेक अडी अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संदर्भातील तक्रारींची दखल घेतली जावी व तातडीने स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक असल्याचे निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले.

ग्राहकांच्या हितरक्षणाकरिता शासनाने तातडीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :

१. घरगुती ग्राहकांच्या वीज देयकातील सर्व अधिभारांचे पारदर्शक व तपशीलवार स्पष्टीकरण सार्वजनिक करावे.

२. शंभर युनिटपर्यंत वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठी अधिभार व स्थिर शुल्कावर मर्यादा घालून संरक्षित दर लागू करावेत.

३. स्मार्ट मीटर संदर्भातील सर्व तक्रारींची स्वतंत्र चौकशी करून ग्राहकांना योग्य पर्याय उपलब्ध करून द्यावेत.

४. औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांचे अधिभार घरगुती ग्राहकांवर टाकले जाणार नाहीत, याबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत.

५. विलंबाने देयक भरल्यास घरगुती ग्राहकांचे विद्युत कनेक्शन तात्काळ तोडण्याऐवजी किमान पंधरा दिवसांची मुदत द्यावी.

६. दरवाढ निश्चित करताना विद्युत निर्मिती खर्च, इंधन खर्च व वाहतूक खर्चाचा तपशीलवार हिशेब घेऊनच निर्णय घ्यावा.

७. इंधन समायोजन अधिभार व इतर आकारणीच्या माध्यमातून जादा वसुल झाल्यास ती रक्कम पुढील देयकात कपात करून ग्राहकांना परत करावी.

८. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (MERC) सार्वजनिक सुनावणीमध्ये शहरी व ग्रामीण भागातील ग्राहक प्रतिनिधींना अनिवार्यपणे सामावून घेण्यात यावे.

९. कृषी ग्राहकांना अधिभारातून सवलत देऊन त्यांच्या कनेक्शन तोडण्यापूर्वी किमान तीस दिवसांची मुदत देण्यात यावी.

१०. स्मार्ट मीटर भारतीय मानक ब्युरो (BIS) प्रमाणित असल्याची खात्री करून, चुकीच्या देयकाबाबत ग्राहकांना तातडीने भरपाई मिळण्याची तरतूद करावी.

११. गरीब व मध्यमवर्गीय घरांकरिता विशेष सवलतीचे दरपत्रक लागू करावे.

वरीलप्रमाणे कार्यवाही तातडीने करण्याबाबत आपल्या स्तरावरून संबंधिताना निर्देश द्यावेत, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केली. यावेळी जिल्हाप्रमुख मीराताई नवले, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महुवले, जिल्हा संघटक संजय महाद्वार, माजी .प .स नवनाथ प्रभाळे ,विधानसभा प्रमुख सुशील भैया पिंगळे, हनुमान काशिद ,कामगार सेना रवी वाघमारे,, गणेश लोणकर , सतीश परदेशीं, शरद पवार सुनील जगताप , रमेश नवले, रंगनाथ पैठणकर ,बलराज कोटुळे , विशाल तांबे सह शिवसैनिक उपस्थित होत.

# खा.बजरंग सोनवणेंच्या हस्ते आज 'मांजरा'तील जलपूजन

## शेतकऱ्यांची राहणार उपस्थिती, दोन दरवाज्यातून पाण्याचा विसर्ग

केजः केज, अंबाजोगाई, धारूर, लातूर, कळंब या शहरासह ६१ गावांची तहान भागवणारे व मांजरा पट्ट्यातील पाच तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आणणारे केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण १०० टक्के भरले आहे.आज सकाळी दहा वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते धरणातील पाण्याचे जलपुजन करण्यात येणार आहे. लातूर शहर, लातूर औद्योगिक



वसाहत, केज, अंबाजोगाई, धारूर, कळंब या शहरासह ६१ गावे मांजरा धरणातील पाणी पुरवठ्यावर निर्भर असतात. मांजरा धरण पिण्याचे पाण्याबरोबर शेती पिकांना लागणाऱ्या पाण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्या अंतर्गत बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील ७३ गावातील १८ हजार २२३ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येते. डावा कालवा ९० कि.मी. अंतराचा आहे. त्यातून १०,५५९ हेक्टर शेती तर, उजवा कालवा ७८ कि.मी. चा असून त्याअंतर्गत ७६६५ हेक्टर शेती सिंचनाखाली येते. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सरासरी १८५ दलघमी पाण्याचा वापर होते. याशिवाय केज व कळंब तालुक्यातील २७ गावातील शेतकऱ्यांना मांजरा धरणाच्या बॅकवॉटर पाण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ होतो. तसेच धरणातील पाण्यावर बिगर सिंचन योजना सुध्दा २१ आहेत तर पिण्याच्या पाणी योजना १६ कार्यरत आहेत. नागरिकांना पिण्यासाठी सरासरी ६१.९३ दलघमी एवढे पाणी आरक्षित ठेवण्यात येते. पाण्याच्या सिंचनाच्या व औद्योगिक दृष्ट्या मांजरा धरण अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मागील काही दिवसांपुर्वी धरण पुर्णपणे भरले होते. यानंतर सहा दरवाजे उघडून पाणी सोडण्यात आले होते. आता चार दरवाजे बंद करण्यात आले असून दोन दरवाज्यातून ४९.४८ क्यूसेक्सने मांजरा नदी पात्र पाण्याचा विसर्ग सुरू आहे. मांजरा धरणामुळे केज तालुक्यातील मोठ्या प्रमाणात हरीतक्रांती झालेली असून आज खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते जलपुजन होत आहे.

### मांजरा धरणाची संक्षिप्त माहिती

-प्रकल्पीय क्षेत्र ४५ चौरस किमी.
-पूर्ण संचयी पाणीपातळी ६४२.३७ मीटर
-प्रकल्पीय एकूण पाणीसाठवण क्षमता २२४.०९३ दलघमी.
-मृत पाणीसाठा ४७.१३० दलघमी.
-उपयुक्त (जिवंत) पाणीसाठा क्षमता १७६.९६३ दलघमी.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २६ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## केळी खाल्ल्यानंतर साल फेकण्याची चुक



भारतात व्हिस्कीचे चाहते मोठ्या संख्येने आहेत, जगातील प्रत्येक दुसरी व्हिस्कीची बाटली इथेच विकली जाते. पण इथे व्हिस्की पिण्याची एक खास पद्धत आहे. अनेकदा लोक व्हिस्कीमध्ये सोडा मिसळून पितात. व्हिस्की आणि सोडा यांच्या या खास कनेक्शनमागचे कारण आणि विज्ञान काय आहे, चला जाणून घेऊया. व्हिस्कीमध्ये सोडा का मिसळतात?

व्हिस्कीमध्ये साधारणपणे 40 ते 50 टक्के अल्कोहोल असते. इतके 'स्ट्रॉंग' पेय थेट (neat) पिणे अनेकांसाठी खूप कठीण असते. यामुळे घशात जळजळ होते आणि ते खूप 'हेवी' वाटते. सोडा या जळजळीला कमी करतो आणि पेयाला 'रिफ्रेशिंग' बनवतो. विशेषतः उन्हाळ्यात सोडा वापरल्याने व्हिस्कीची चव अधिक स्मूथ होते आणि ती सहजपणे पिता येते. यामागे वैज्ञानिक कारण आहे

व्हिस्कीमध्ये अनेक प्रकारचे एरोमॅटिक कंपाउंड्स (aromatic compounds) असतात, जे व्हिस्कीला तिचा खास सुगंध आणि चव देतात. जेव्हा व्हिस्कीमध्ये सोडा किंवा पाणी मिसळले जाते, तेव्हा हे फ्लेवर अधिक खुलून येतात. यामुळे व्हिस्कीची चव आणखी चांगली होते. वैज्ञानिकदृष्ट्या, सोडा मिसळल्याने व्हिस्कीतील रसायनशास्त्र (chemistry) बदलते आणि तिची खरी चव आणि सुगंध बाहेर येतो. ऐतिहासिक आणि आरोग्यविषयक कारणे

काही वर्षांपूर्वी प्रीमियम व्हिस्की इतकी सहज उपलब्ध नव्हती. त्यामुळे, व्हिस्कीचा स्वाद वाढवण्यासाठी आणि ती जास्त वेळ चालावी यासाठी सोडा मिसळण्याची पद्धत सुरू झाली. पिढी-दर-पिढी ही पद्धत सुरू राहिली आणि आज ती भारतीय पेयांच्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग बनली आहे.

आरोग्याच्या दृष्टीनेही सोडा मिसळणे फायदेशीर ठरू शकते. थेट व्हिस्की प्यायल्याने पोटात ॲसिडिटी (acidity) आणि जळजळ होण्याची समस्या होऊ शकते. तज्ज्ञांच्या मते, जास्त अल्कोहोलमुळे जीभ आणि घशातील 'रिसेप्टर्स' बधीर होतात, ज्यामुळे जळजळ जाणवते. सोडा व्हिस्कीला काही प्रमाणात सौम्य करतो आणि पोटाचे नुकसान कमी करण्यास मदत करू शकतो. अर्थात, कोणत्याही स्वरूपातील अल्कोहोल आरोग्यासाठी हानिकारक आहे.

सोडा मिसळल्याने व्हिस्कीची चव खरोखरच बदलते. ते पेय पिणे अधिक सोपे, अधिक चविष्ट आणि कमी त्रासदायक बनवते. त्यामुळे, व्हिस्की आणि सोडा यांचे मिश्रण हे केवळ एक फॅशन स्टेटमेंट नसून, त्यामागे अनेक वैज्ञानिक आणि व्यावहारिक कारणे आहेत.



स्वागत...सत्कार..शुभेच्छा... आज गेवराई पंचायत समितीचे नवनिक्युक्त बीडीओ अनिरुद्ध सानप साहेब यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या यावेळी जयदीप भैय्या औटी, भीवा अप्पा हिंगे,शैलेश संत सर, मोबीन नाईकवाडी, अझहर ईनामदार, दत्ता औटी सह राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, उमापूर

# जिल्ह्यातील 4 हजार 720 प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांचे आदेश...

प्रतिनिधी अहिल्यानगर : गेल्या काही दिवसांपासून रखडलेले प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांचे आदेश अखेर ऑनलाइन पद्धतीने प्राप्त झाले आहेत. बदल्यांचे आदेश यंदा ऑगस्टअखेरीस काढण्यात आले आहेत. तसेच बदल्या झालेल्या शिक्षकांच्या संख्येतही यंदा मोठी वाढ झाली आहे. यंदा जिल्ह्यातील ४ हजार ७२० शिक्षकांच्या बदल्यांचे आदेश काढण्यात आले आहेत. प्राथमिक शिक्षण विभागाकडून ही माहिती उपलब्ध झाली. मात्र, बदली झालेल्या शिक्षकांना अद्याप बदली ठिकाणी हजर होण्याचे आदेश देण्यात आलेले नाहीत. बदल्यांचे प्राप्त झालेले आदेश हे एक ते तीन संवर्गातील आहेत. प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या यापूर्वी मे अखेरीपर्यंत पार पडत होत्या. परंतु, यंदा बदल्या होण्यास ऑगस्टअखेर उजाडला आहे. बदल्यांच्या संवर्ग एकमधील अपंग प्रमाणपत्रसह अन्य सवलतींचा फायदा घेतलेल्या शिक्षकांच्या चौकशीची प्रक्रिया अद्याप संपलेली नाही. यासंदर्भात बदल्यांमध्ये सवलतीचा लाभ घेतलेल्या शिक्षकांच्या तपासणीचा गटविकास अधिकाऱ्यांकडून शिक्षण विभागाला अहवाल प्राप्त झालेला नाही. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संवर्ग एकबाबत



निर्णय होणार आहे. प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांची प्रक्रिया गेल्या दीड महिन्यांपासून सुरू आहे. या प्रक्रियेत संवर्ग एकमधील ८६३ शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या. त्यामध्ये अपंग प्रमाणपत्र असणारे, दुर्धर आजाराने पीडित, घटस्फोटीत, अपंग विद्यार्थ्यांचे पालक असणारे शिक्षक आदींचा समावेश आहे. ग्रामविकास विभागाच्या सूचनेनुसार संबंधित शिक्षकांची तालुका पातळीवरील गटविकास अधिकाऱ्यांकडून पडताळणी सुरू आहे. संवर्ग दोनमधील ३७४, अवघड क्षेत्रातील ३८८ व आता बदली पात्र असणाऱ्या ३ हजार ९५ शिक्षक अशा एकूण तिन्ही संवर्गातील ४ हजार ७२० शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. शिक्षकांना ग्रामविकास विभागाच्या आदेशानुसार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून बदल्यांचे ऑनलाईन आदेश पाठवण्यात आले आहेत. मात्र, बदली ठिकाणी हजर होण्यासाठी पुन्हा स्वतंत्र आदेश काढावे लागणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

# आदर्श पत्रकार जयश्री बी सोनवणे लोकशाहीर साहित्यरत्न जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित



प्रतिनिधी - जगदीप वनशिव सांगली - येथील ए डी फाउंडेशन सांगली आयोजित पुरस्कार प्रदान सोहळ्यात साहित्य कला पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर नावलौकिक करणाऱ्या उत्कृष्ट व आदर्श पत्रकार तथा वृत्त निवेदिका जयश्री बी सोनवणे यांना नुकताच सांगली येथे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, मेडल देऊन कार्यक्रमाचे अध्यक्ष खासदार डॉ विशाल पाटील, सांगलीचे माजी महापौर डॉ. नितीन सावगावे यांच्या शुभहस्ते व आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. जयश्री सोनवणे यांचं सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रामध्ये आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवून एक विद्रोही बाणा, रोखठोकपणा उभ्या महाराष्ट्राला दाखवणारं महिला संघटन कौशल्य म्हणून उदयाला आलेलं महिलांचे कुशल नेतृत्व तथा दैनिक माझा मराठवाडा वृत्तपत्राच्या त्या निवासी संपादिका रिपब्लिकन आवाज न्यूजच्या उपसंपादिका तथा ज्ञानपंख 24 न्यूज या चॅनलच्या वृत्त निवेदिका आहेत. महिलांचे कुशल नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे आज पाहिलं जातं. त्या एक पत्रकार तर आहेतच त्यासोबतच त्या एक उत्तम कवयित्री देखील आहे. जिथे कुठे महिलांवर अन्याय अत्याचार होतो. त्या ठिकाणी अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्या हजर असतात. अनेक संस्थांना भेट देऊन गोरगरिबांना मदत मिळवून देणे, सद्य परिस्थितीवर शाळा, कॉलेज या ठिकाणी जाऊन मुलींना परिस्थितीशी दोन हात कसे करायचे यावर मार्गदर्शन करणे. अनेक हॉस्पिटलमध्ये गोरगरिबांची फसवणूक होते. त्या ठिकाणी जाऊन त्यांची फसवणूक न होऊ देणे. त्याचबरोबर त्यांचे जे काही हॉस्पिटलचे बिल असते ते जास्तीचे आकारण्यात येते ते कमी करून देणे म्हणजेच अन्यायाविरुद्ध त्यांची लढत आहे. पुणे जिल्ह्यात नव्हे तर महाराष्ट्रात एक स्त्री म्हणून आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर पत्रकारिता सामाजिक कार्य महिलांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे विषय घेऊन लढणाऱ्या एक लढाऊ व्यक्तिमत्व. याचं कार्याची दखल घेऊन त्यांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जीवन गौरव पुरस्कार हा जाहीर करून त्यांना तो प्रदान करण्यात आला. या घेण्यात आलेल्या पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शिका स्वाती कोकरे, समाज प्रभोधनकार, व्याख्याते, प्रसिध्द सांगली, उद्घाटक डॉ. गुरु बगली श्रीरना ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट सांगली स्वागताध्यक्ष विष्णू माने राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य, कार्यक्रमाचे पाहुणे इद्रीस नायकवडी विधानपरिषद, सावंत माजी विधानसभा, विशेष उपस्थिती सुजय नाना शिंदे सभापती मार्केट कमिटी सांगली, संगीता खोत माजी महापौर सांगली, संदीप सूर्यवंशी सहाय्यक पोलीस निरीक्षक, कराड, निवेदक प्रा. घनश्याम चौगुले महात्मा विद्यामंदिर हाय. व ज्यु, कॉलेज, उमदी. निमंत्रक अशोक श्रीपती गोरड, अध्यक्ष, ए.डी. फाऊंडेशन. महादेव महानूर कार्याध्यक्ष, आमदार विक्रम आमदार जत, प्रमुख फाऊंडेशन, समनडी, संयोजन समिती दिलीप वाघमोडे, सुप्रसिद्ध निवेदक पत्रकार रानकवी जगदीप वनशिव शरद माने, दादासो गोरड, शेंडगे सागर म्हारनूर आदी मान्यवर, कार्यक्रमाचे आयोजक, सर्व पुरस्कारार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार्थी जयश्री वी सोनवणे यांनी यांनी प्रसार प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितलं की हा सन्मान माझा नसून समाजाचा माझ्यावर असणाऱ्या विश्वासाचा आहे. या पुरस्काराने मला आणखीन नवीन जबाबदाऱ्या दिल्या आहेत असं मला वाटतं आणि आणखी कार्य करण्याची प्रेरणा या पुरस्काराने मला मिळाली आहे. हा सन्मान शक्य झाला तो मार्गदर्शक, सहकारी आणि शुभेच्छुक यांच्या प्रेम व विश्वासामुळे. आपल्या सर्वांच्या आशिर्वादा शिवाय हे शक्य नव्हते. त्यामुळे मी पुन्हा एकदा सर्वांचे आभार मानते अशा व्यक्त भावना सुद्धा त्याने केल्या पुरस्कार्थी जयश्री बी सोनवणे यांचा विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे

# कान्हादेश (खान्देश )मित्र मंडळ उरण विभाग नवी मुंबई तर्फे मेळावा उत्साहात संपन्न.

प्रजा-शासन प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे उरण दि २५ नाशिक धुळे जळगाव नंदुरबार जिल्ह्याचा भाग खान्देश म्हणून ओळखला जातो. खान्देश हा महाराष्ट्राचा अविभाज्य व महत्त्वाचा भाग आहे आज खान्देशातील नागरिक महाराष्ट्रात सर्वत्र व महाराष्ट्र बाहेर तसेच देश विदेशात नोकरी व्यवसाय धंद्या निमित्त मोठया प्रमाणात स्थलांतरित झाले आहेत. देशाच्या विकासात आजपर्यंत खान्देश मधील नागरिकांचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. खान्देश मधील नागरिक रायगड जिल्ह्यात व नवी मुंबई परिसरात नोकरीत धंद्या निमित्त मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. विविध ठिकाणी विखुरलेल्या खान्देश मधील नागरिकांना एकत्र करण्याच्या उद्देशाने तसेच एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होऊन खान्देश नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्याचा उद्देशाने कान्हादेश (खान्देश ) मित्र मंडळ ची स्थापना झाली असून विविध नागरिकांची एकमेकांना ओळख व्हावी, खान्देश मधील संस्कृती, आचार विचाराचे



जतन व्हावे, संवर्धन व्हावे या दृष्टिकोनातून कान्हादेश (खान्देश )मित्र मंडळ उरण विभाग नवी मुंबई तर्फे रविवार दिनांक 24 /8/2025 रोजी उरण तालुक्यातील करंजा रोड वरील भारती बँक्वेट हॉल येथे खान्देश मधील नागरिक जे रायगड जिल्ह्यात व नवी मुंबई परिसरात वास्तव्यास आहेत अशा नागरिकांचा मेळावा स्नेहभोजन कार्यक्रम व सत्यनारायण महापूजा मोठ्या उत्साह संपन्न झाले. सकाळी ९ ते १० सत्यनारायण पूजा, सकाळी १० ते १२ नृत्य गायन वकृत्व स्पर्धा,दुपारी १२ ते २ या वेळेत सहभोजन आदी विविध सांस्कृतिक धार्मिक सामाजिक उपक्रम मोठया उत्साहात संपन्न झाले.या मेळाव्याला व विविध कार्यक्रमाला महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील प्रतिष्ठित मान्यवरांनी भेट देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.लहास प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुलाबराव जाधव,नवजिवन लोक विकास संस्थाचे अध्यक्ष किशोर पाटील,मराठा सेवा संघ कल्याण उपाध्यक्ष बाळासाहेब भोसले,हिंदी व मराठी गाण्यांचे गायक विनोद चोधरी बेलापूर,आरोग्य सेवा भिवंडीचे अध्यक्ष कैलास पाटील, खान्देश मित्र मंडळ ठाणेचे उपाध्यक्ष शांताराम पाटील, ठाणे जिल्ह्याचे उद्योजक विकास पाटील,डॉक्टर चेतन पाटील पनवेल आदी प्रतिष्ठित मान्यवरांनी या मेळाव्यास भेट दिली. त्यांनी सदर मेळावा व उपक्रमाचे कौतुक केले. तसेच सर्व पदाधिकारी सदस्यांच्या कार्याचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.कान्हादेश (खान्देश )मित्र मंडळ उरण विभाग नवी मुंबई या संघटनेचे अध्यक्ष प्रकाश चित्ते,कार्याध्यक्ष सुनील चौधरी,उपाध्यक्ष आनंद कुमावत, उपाध्यक्ष कैलास भामरे,खजिनदार वामन राठोड, सह खजिनदार संजय पाटील, सेक्रेटरी सचिन खैरनार, कार्याध्यक्ष डॉक्टर विजय देवरे,सह खजिनदार भरत पाटील, सह सेक्रेटरी ईश्वर माळी,सह सेक्रेटरी संदीप पाटील, सदस्य भगवान राठोड यांच्यासह सर्वच पदाधिकारी सदस्यांनी हा मेळावा व विविध उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. यावेळी नागरिकांनी विविध कार्यक्रम उपक्रमांचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. या कार्यक्रमातून खानदेश संस्कृतीचा आचार विचारांची ओळख सर्वांना झाली असून मेळावा व इतर कार्यक्रमाचे सुंदर आयोजन व नियोजन केल्याने असा उपक्रम दरवर्षी राबविण्यात यावा अशी मागणी नागरिकांनी आयोजकांकडे केली.व चांगल्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याने नागरिकांनी आयोजकांचे आभार मानले.एकंदरीत कान्हादेश (खान्देश )मित्र मंडळ आयोजित मेळावा व इतर कार्यक्रमांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

# निगडीतील शिवभूमी प्राथमिक विद्यालयात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा संपन्न






आमच्या शिवभूमी विद्यालय प्राथमिक शाळेत,"पर्यावरणपूरक गणपती मूर्ती "बनविण्यासाठी मा.मुख्याध्यापक सौ पाटील अश्विनी व ECA यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. या कार्यशाळेत श्री सिकंदर घोडके, सौ. मेरुरकर मॅडम,सौ घोडके मॅडम, सौ. तळेकर मॅडम व श्री चव्हाणसर यांनी विद्यार्थांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले

कार्यशाळेत २री ते ४थी मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन अनेक वेगवेगळ्या सुंदर गणेश मूर्ती तयार केल्या.या कार्यशाळे तील उत्कृष्ट गणेशमूर्त्या कला शिक्षक श्रीम कोठेकर योगिता यांनी निवडल्या.मा.मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व हत्यकौशल्याला वाव देण्यासाठी प्रोत्साहन दिले व सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच या कार्यशाळेत गणपती विसर्जनाविषयी जागृती करण्यात आली पुजाविधीचे सर्व निर्माल्य योग्य ठिकाणीच विसर्जित करण्या विषयी विद्यार्थ्यांना सांगण्यात आले

सर्वांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या मुर्त्यांचे कौतूक केले व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २६ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# गावागावात मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाची तयारी, जेवणाचा मेनू ठरला

## आंदोलकांच्या नाश्त्या पाण्यासाठी गरमा गरम पालक पुऱ्यांची आणि चटणीची सोय करण्यात आली आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील हे 27 ऑगस्टला हजारो मराठा बांधवांसह मुंबईकडे रवाना होणार आहे. मराठा आरक्षणासाठी 29 ऑगस्टपासून ते बेमुदत आंदोलन करणार आहेत. मनोज जरांगे यांच्या मुंबई दौऱ्याची तयारी जोरात सुरु आहे. ठिकठिकाणी आंदोलकांना नाश्ता आणि जेवणाची सोय करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

आंदोलकांना नाश्त्यासाठी काय मिळणार?मनोज जरांगे यांनी आंदोलनाची हाक दिल्यानंतर आंदोलकांची लगबग सुरू झाली आहे. अंतरवाली सराटी जवळील साष्ट पिंपळगाव येथे सरपंच आणि स्थानिक नागरिकांनी आंदोलकांच्या नाश्त्या पाण्यासाठी गरमा गरम पालक पुऱ्यांची आणि चटणीची सोय करण्यात आली आहे. आजपासून ही तयारी सुरू झाली असून मुंबई मार्गावर जाणाऱ्या सर्व आंदोलकाना निघताना या नाश्त्याचा आस्वाद घेता येणार आहे. स्थानिक नागरिक आणि सरपंचांनी आचारी लावून ही सोय केली आहे. तसेच मुक्कामाच्या ठिकाणी आणि रस्त्यातही आंदोलकांना नाश्ता आणि जेवण देण्यात येणार आहे. धाराशिव जिल्ह्यामधून उद्या मराठा बांधव आंतरवाली सराटीकडे निघणार 29 ऑगस्ट रोजी मुंबई येथे होणाऱ्या मराठा आरक्षण आंदोलनासाठी धाराशिव



जिल्ह्यातील मराठा बांधवांनी मोठी तयारी केली आहे. जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ उद्या आंतरवालीकडे मराठा कार्यकर्ते रवाना होणार आहेत. आता आरक्षण घेतल्याशिवाय माघारी फिरायचं नाही असा निर्धार यावेळी आंदोलकांनी केला आहे.

### पहिला मुक्काम शिवनेरीवर

मनोज जरांगे पाटलांनी मुंबईला जाण्याचा मार्ग सांगितला आहे. 27 तारखेला आंतरवाली सराटी मधून आम्ही बाहेर पडणार आहोत पैठण, शेवगाव, पांढरीपुल, अहिल्यानगर, आळेफाटा आणि त्यानंतर रात्रीचा मुक्काम शिवनेरी किल्ल्यावर राहील. 26 तारखेच्या आत अंमलबजावणी केली तर ठीक आहे, अन्यथा एकदा अंतरवाली सराटी सोडली तर नंतर चर्चा करणार नाही. थेट मुंबईमध्ये गेल्यावर चर्चा करू असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, 'सरकारला मराठ्यांना आरक्षण द्यायचं नाहीये, फक्त त्यांना काहीतरी कुरापती उकरून काढायच्या आहेत. आरक्षण द्यायची वेळ आली तर आता फडणवीस आईला पुढे करत आहे. त्यांच्या आईला काही शब्द बोललो असेल तर ते मी ते विधान मागे घेतलेले आहे. मराठ्यांना आरक्षण द्यायचं नाही, मुंबईत येऊ द्यायचं नाही.'

# धनगर समाज एसटी आरक्षण अमंलबजावणी बाबतचा लढा तीव्र करणार,... पांडुरंग मेरगळ.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम धनगर समाज एसटी आरक्षण अमंलबजावणी बाबतचा लढा तीव्र करणार असल्याचे पांडुरंग मेरगळ यांनी राज्यव्यापी बैठकीत सांगितले. रविवार दिनांक २४ आगस्ट २०२४ रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत फलटण येथील महात्मा शिक्षण संस्था संचालित मूकबधीर विद्यालय ठाकूरकी कुरवली रोड या ठिकाणी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतून आलेल्या प्रतिनिधींना धनगर समाज बांधवांच्या आरक्षण अमंलबजावणी बाबतच्या लढ्याची माहिती देताना पांडुरंग मेरगळ यांनी सांगितले की ';' महाराष्ट्र राज्यातील १३टक्के असलेल्या धनगर समाज बांधवांच्या आरक्षण अमंलबजावणी बाबतचा लढा यापुढे तीव्र केला जाईल, भारत देश संविधानावर चालणारा देश आहे, घटनेच्या ३४२ कलम मध्ये आरक्षण चार उल्लेख आहे, मानववंशशास्त्रज्ञ यांच्या ग्रंथाचा संदर्भ, जात निहाय गणणा, आणि स्वातंत्र्यापूर्वी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षण बाबतीत लिहीलेले लिखाण यांच्या पायावर आधारित आपली घटना आहे,सहा कायदे नुसार महाराष्ट्र राज्यात ३६ वर धनगड आहे,ते इंग्रजी मधून मराठी तभाषांतर करताना धनगर झाले, जे सहा कायदे आहेत त्यात घटनेच्या कलम ३४८(३) नुसार धनगर च आहे धनगर समाजाला १००टक्के आरक्षण अमंलबजावणी सहज होऊ शकते, धनगर समाजाला आरक्षण अमंलबजावणी म्हणजे सोन्याचा डोंगरच आहे, शैक्षणिक, आर्थिक,



उद्योग, यात आमुलाग्र बदल होऊन समाजाचे भले होईल, संधी मिळाली तर विकास होईल, आजच्या या बैठकीचे उद्दिष्ट आहे की, धनगर समाज एसटी आरक्षण अमंलबजावणी बाबत संघटनात्मक बांधणी करुन लढा तीव्र केला जाईल,"या बैठकीला महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील प्रतिनिधी उपस्थित होते, सर्वांनी संघटनात्मक बांधणी करुन लढा तीव्र करण्याचा निर्णय घेतला," या वर आमचे मुंबई प्रतिनिधी व जेष्ठ पत्रकार भारत कवितके यांनी पांडुरंग मेरगळ यांचेशी संपर्क साधला असता कळाले की, फलटण येथील या राज्यव्यापी बैठकीत झालेल्या बाबत चंद्रकांत दादा पाटील यांनी या बाबतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बोलतो असे सांगितले, यावेळी पांडुरंग मेरगळ, दादासाहेब चोरमले, भारत कवितके, राजेंद्र बरगडे, रमेश धायगुडे, माणिकराव सोनवलकर, आप्पा साहेब मारकड भिमराव बुरुंगळे बिरुदेव कोळेकर, , कुमार देवकते, विकास सोनवलकर, संजय चोरमले, खंडेराव सरक, विशाल धायगुडे, निखिल खटके, बजरंग गावडे, शंकर शिंगाडे,आणि इतर समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

## हज़रत शहंशाहवली रहमतुल्लाह अलैह दरगाहचा संदल कार्यक्रमास उपस्थित रहा –शाहबाज कादरी



बीड (प्रतिनिधी):हज़रत शहंशाहवली रहमतुल्लाह अलैह दरगाहचा संदल कार्यक्रम दिनांक 26 ऑगस्ट 2025, मंगळवार रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शाहबाज़े लमकानी कादरी फाउंडेशनचे ऑल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष शेख शाहबाज कादरी यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे वेळापत्रक :

26 ऑगस्ट 2025 (मंगळवार) – संध्याकाळी 5:00 वाजता नमाज-ए-असर नंतर किल्ला मैदान येथून संदल निघेल.रात्री 10:00 वाजता संदल दरगाह येथे पोहोचेल व संदल चढवला जाईल.27 ऑगस्ट 2025 (बुधवार) – पहाटे नमाज-ए-फजर नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल.



डॉ. सय्यद शौकत अली सर यांचा मुलगा डॉ. शाज़ेब अली आणि डॉ अताऊल्ला जागीरदार सर यांच्या मुलीच्या एंगेजमेंटच्या कार्यक्रमात शामिल होवून डॉ सय्यद शौकतअली सर व डॉ आताऊल्ला जागीरदार सर यांना शुभेच्छा देण्यात आले यावेळी डॉ मिर्झा हाशम, डॉ दस्तगीर शेख, डॉ अन्सार शेख, डॉ लतीफ शेख, डॉ. इलियास शेख, डॉ जावेद शेख, डॉ मुख्तार शेख, इंजीनिअर मुजाहिद काजी, शहनवाज काझी सहाब डायरेक्टर, डा.दस्तगीर देशमुख डॉ. मुजावर एस टी सर आणि लोकसेना संघटना प्रमुख ॲड. प्रा. इलियास इनामदार यांची उपस्थिती होती.

# जीवनवेल काव्यसंग्रह प्रकाशन सोहळा व काव्यमेळावा संपन्न

प्रतिनिधी- जगदीप वनशिव नाशिक - येथील नाशिक कवी संस्थेचा काव्यमेळावा व पुस्तक प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिक कवी संस्थाचे अध्यक्ष बाळासाहेब मगर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक, चारोळीकार दिलीप बारावकर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण मेतकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय कार्यवाह नंदकिशोर ठोंबरे यांनी करून दिला. तर नाशिक कवी संस्थेची भूमिका सुभाष सबनीस यांनी विषद केली. जवळपास ३२ कविंनी आपल्या रचना सदर केल्यात. कवी रमेश चौधरी यांच्या "जीवनवेल" या काव्यसंग्रहचे प्रकाशन उपस्थित मान्यवा्रांच्या शुभहस्ते झाले. प्रास्ताविक नंदकिशोर ठोंबरे यांनी केले तर प्रकाशन समारंभाचे सूत्रसंचालन



उपाध्यक्ष गझलकार कवी बाळासाहेब गिरी यांनी केले. कवी रमेश चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. यशवंत पाटील सर यांचे काव्यसंग्रहास ब्लर्ब लाभले आहे. त्यांनी याप्रसंगी काव्यसंग्रह बद्दल आपले मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावर बाळासाहेब मगर, दिलीप बारावकर, सुभाष सबनीस, डॉ यशवंत पाटील, नंदकिशोर ठोंबरे, किरण मेतकर, आणि रमेश चौधरी होते. यावेळी सादर केलेल्या रचनातून अशोक भालेराव, राजेश जाधव, संतोष जोशी, सौ. अनार देवरे, योगेश जाधव यांच्या रचना उत्कृष्ट ठरल्यात त्याना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुस्तक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. खालील कविंनी आपल्या रचना सादर केल्या संजय आहेर, रमेश चौधरी, रविकांत शार्दूल, सोनाली चव्हाण, शुभांगी भोकरे, सुरेश देवरे, शिवराज शिरसाठ, रेखा सोनवणे, राजेश जाधव, सुधीर कुलकर्णी, मृणाल प्रभुणे, रेखा नाशिककर, कविता कासार, संदीप बद्दर, सुभाष उमरकर, योगेश जाधव, कविता बिरारी, डॉ. यशवंत पाटील, माधव जोशी, साहेबराव उगले, अशोक भालेराव, उज्वला वडनेरे. अध्यक्ष बाळासाहेब मगर यांनी आपल्या नेहमीच्या खुमासदार शैलीत संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेतला आणि जीवनवेल काव्यसंग्रहतील कविता वाचून दाखवली. आभार प्रदर्शन किरण मेतकर यांनी केले. नाशिक येथील नाट्य परिषद हॉल कालिदास कला मंदिर येथे कार्यक्रमाची सांगता झाली.

# बीड़मध्ये लक्ष्मण हाके विजयसिंह पंडित यांच्या कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा

बीडमध्ये ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा झाला आहे. बीडमध्ये ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा झाला आहे. लक्ष्मण हाके यांनी ओबीसी समाजाच्या बैठकीत विजयसिंह पंडित यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केले होते. त्यानंतर या दोन नेत्यांमधील वादाला सुरुवात झाली होती. हाके यांच्या विधानाचा निषेध करत पंडित यांच्या कार्यकर्त्यांनी गेवराईमध्ये लक्ष्मण हाके यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन केले होते, त्यामुळे हा वाद आणखी पेटला होता. गेवराईमध्ये राडा झाला असल्याची माहिती आमदार विजयसिंह पंडित यांनी मनोज जरांगेंना पाठिंबा देत चलो मुंबईचे बॅनर लावले होते. त्यामुळे हाकेंनी वादग्रस्त विधान केले होते. त्यामुळे पंडित यांचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते, तसेच त्यांनी हाके यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळला होता. त्यानंतर पंडित



यांना आव्हान देत आज लक्ष्मण हाके गेवराईत आले होते. यावेळी दोन्ही नेत्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये राडा झाला. दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांवर चपला फेकत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना समजावण्याचा प्रयत्न पोलिसांकडून करण्यात आला असल्याचे समजते आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com